रांगा भरल्या, गर्दी झाली........... देवाचाही श्वास कोंडला
शेंदूर फासल्या कपाळावर गर्दी पाहून घाम फुटला.

एकजात सारे चेहरे केविलवाणे, भुकाळलेले
एकजात सारे हात न चुकता जोडलेले
एकजात सारे डोळे घट्ट घट्ट मिटलेले
ओठावर साकडे पुटपुटणारे इथून तिथून सारेच्या सारे !

लोंढा वाढला, नारळ फुटले, प्रसादही भरपेट झाला
आणाभाका, गाऱ्हाणी शपथा, नवसांचा तर पूरच आला
नवस केला, नवस फेडला, नशीबांचाच मटका लावला
इवला इवला तान्हा जीव नवसाचाच प्रसद ठरला.

आली गेली लोटली गर्दी, फायद्यासाठी खोटी भक्ती
उन्हातच केस पिकवलेली, धुरकट बिकट फिकट शक्ती
साऽला कशातच दम नाही! मनात राम तर नाहीच नाही
मुठीतली रग मुठीतच बंद.... दाबल्या ओठांतही चीड नाही!

थकले भागले केविलवाणे तेच तेच वाकले जीव
हपापलेले भुकाळलेले पडके तोंड, आली कीव
आला सोम्या, आला गोम्या... 'घे वर; भोग सुख!'
असं म्हणणारा देवही आता थोडा थोडा अंतर्मुख !

पाहून रडकेपडकेचेहरे देवच आता कंटाळला
पसरलेले भुकाळलेले हात पाहून संतापला

CONFIDENTIAL

‘देवा माझंच भलं कर’ म्हणणाऱ्यांचा लोंढा होता
‘देवा तुझही भलं होऊ दे’ म्हणणारा नैवेद्यालाही नव्हता!

रंजलेले गांजलेले एकाच भूमीत कसे सारे?
कंटाळालेले आळसावलेले निर्ढावलेले कसे बरे!
मंदिरांमध्ये आमुच्या अशक्तांची भली पैदास
माथा उजळ टेकेना.. मन खिन्न भकास उदास

केविलवाण्या बुरख्याआड प्रयत्नांचा चेहरा नाही
एकाही मिटल्या डोळ्यांवर विश्वासाचं झापड नाही
पुटपुटणाऱ्या ओठांवरती कटू सत्यवाणी नाही
देव चैतन्यशक्ती! मृगजळी देव नाही!!

उठा, निषेध करा आता देणाऱ्याच्या हातांचा
प्रयत्ने मिळवू सारे! मागताना खिळू दे वाचा!
फिरूनी चैतन्य सळसळू दे, दृढ विश्वास मनाचा.
देव पावसाळी थेंब, चातकाने टिपायाचा!

***: जिगीषा***

CONFIDENTIAL